पुण्य नगरी

# आशा केंद्राच्या माध्यमातून जागतिक स्तरावर काम करणार : डॉ. शेळके

**पुणतांबा** : आशा केंद्राने ४० वर्षांच्या कालखंडात अनेक चढ-उतार पाहिले. विविध सामाजिक प्रश्नांचा आभ्यास करून समाजातील वंचित घटकांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी सतत प्रयत्न केले. कार्यकर्त्यांना घडविणारी प्रयोगशाळा म्हणजे हे केंद्र आहे. त्याच्या प्रगतीत कर्मचाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे. भविष्यात याच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रात जागतिक स्तरावर काम करून सामाजिक व रुग्णसेवा करणार, असे प्रतिपादन आशा केंद्राचे कार्यकारी विश्वस्त डॉ. सुरेश शळके यांनी केले.



पुणतांबा : येथील आशा केंद्रात आयोजित कार्यक्रमात बोलताना केंद्राचे कार्यकारी विश्वस्त डॉ. सुरेश शेळके. मंचावर मान्यवर.

आशा केंद्राच्या वतीने आयोजित कार्यक्रमात डॉ. शेळके बोलत होते. प्रास्ताविक कार्यकारी संचालक डॉ. धनंजय धनवटे यांनी केले. त्यांनी केंद्राच्या माध्यमातून सुरू असलेल्या सेवेची माहिती दिली. मंचावर चित्रकार उल्हास वेदपाठक, भरतकुमार उदावंत, रवी भागवत, प्रा. युसुफ बेनूर, डॉ. मोतीलाल तायडे, लेखापरीक्षक अरुणकुमार शहा उपस्थित होते.

डॉ. शेळके म्हणाले, की आशा केंद्राच्या ४० वर्षांच्या कालावधीत अनेक चढ-उतार पाहिले. केंद्राच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम हाती घेऊन समाजातील वंचित घटकांना व विधवा महिलांना न्याय देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे डॉ. शळके म्हणाले.

यावेळी चित्रकार प्रमोद कांबळे, यूसुफ बैनूर, उल्हास वेदपाठक, रवी भागवत यांनी मनोगत व्यक्त केले. अशा केंद्रातील निवृत्त कर्मचारी डेव्हीड पारधे व लिलाताई पारधे यांचा व आशा केंद्राच्या जालना जिल्ह्यातील करमाड येथील शाखेत उत्कृष्ट सेवा देत असलेल्या योगिता गायकवाड व कैलास गायकवाड यांचाही सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून सर्वांची मने जिंकली. गोदामाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय धनवटे, ताराचंद पेटकर, भास्करराव नवले, मनोज धनवटे, डॉ. धनश्री धनवटे, व्यवस्थापक किशोर कदम, वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय वलवे, प्रशासकीय अधिकारी सचिन उबाळे, सुनील पंडित, अनुपमा धनवटे, रमेश भोईर यांच्यासह आशा केंद्राचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. आभार किशोर कदम यांनी मानले.

Smart Shrirampur Edition
Jan 31, 2024 Page No. 4
Powered by : eReleGo.com